दि. 22 – 8 - 23

मा. जिल्हा पोलीस प्रमुख,

जिल्हा पोलीस मुख्यालय,

सातारा .

**विषय: सातारा जिल्यात सलोखा निर्माण करण्या बाबत -**

महोदय,

आपल्या सातारा जिल्ह्यामध्ये मागील काही काळात धार्मिक आणि जातीय सलोखा बिघडवून अशांतता निर्माण करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुस्लिम समाजातील तरुणांवर स्टेटस ठेवल्याच्या निमित्ताने हल्ले/मारहाणीचे प्रकार घडत आहेत. तसेच अनेक ठिकाणी सुफी दर्गा /मजार उखडून टाकण्याचे प्रयत्न होत आहेत. यामुळे मुस्लिम समाजात भीतीचे वातावरण पसरले आहे. अल्पसंख्याक समाजाविषयी गैरसमज पसरवणारी द्वेषपूर्ण भाषणे , मेसेजेस , चित्रफिती यांचा प्रसार वाढला आहे. त्यामुळे वातावरण अधिक प्रक्षोभक होत आहे. याविषयी आम्ही यापूर्वीही आपणास अवगत करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा संवेदनशील पार्श्वभूमीवर दिनांक 15 ऑगस्ट 2023 रोजी सकाळी 8.30 वाजता एका अल्पवयीन मुलाच्या इंस्टाग्राम अकाउंट वर महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अत्यंत विषारी आणि घाणेरडे मेसेजेस पोस्ट झाल्याचे त्याच्या मित्रांना आढळून आले. त्यांनी लगेचच त्याच्या आईला हे नेऊन दाखवले. त्या माऊलीने या मुलाला तातडीने बोलवून याविषयी विचारणा केली. जेव्हा या मुलाने आपले इंस्टाग्राम अकाउंट लॉगिन केले तेव्हा असे भयंकर मेसेज पाहून तोही हादरला. त्या अकाउंट वर सलग अशा भयंकर विषारी पोस्ट चालूच होत्या. त्याने तातडीने हा मेसेज माझा नाही माझे अकाउंट हॅक झाले आहे. मला माफ करा. असा मेसेज पोस्ट केला असता तोही मेसेज लगेचच डिलीट झाला. घाबरलेल्या कुटुंबीयांनी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते फिरोज पठाण यांना संपर्क केला असता त्यांनी तातडीने पोलिसांच्या कडे जाण्यास सांगितले. त्यानुसार हे सर्व कुटुंब सातारा शहर पोलिसांच्याकडे गेले. (दरम्यान इथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की या मुलाकडे स्वतःचे सिमकार्ड नाही तर फक्त हँडसेट आहे. तो आई-वडिलांच्या किंवा मित्रांच्या सिम कार्डचे वाय-फाय घेऊन आपले इंस्टाग्राम अकाउंट वापरत होता. हा मुलगा अतिशय हुशार आहे. सुंदर ताशा वाजवतो. डीजेचे त्याला वेड आहे. मोबाईल वरूनच ग्राफिक डिझाईन त्यांने शिकला आहे. शिवाजी महाराजांचा भक्त आहे. त्याच्या घरात महाराजांचे तीन पुतळे आहेत. इतकेच नव्हे तर गणपती उत्सवामध्ये तो स्वतःच्या घरी दीड दिवसाचा गणपती बसवतो.)

सातारा शहर पोलिसांकडे मुलगा , त्याची आई आणि मावशी पोलिसांच्या समोर असतानाच या अकाउंट वरून घाणेरडे मेसेज येणे चालूच राहिले होते. मेसेजेस कुठून येतात हे कळत नव्हते. अकाउंट हॅक झाले आहे हे लक्षात आले होते . पोलिसांनी हा मोबाईल लगेचच ताब्यात घेतला.

दरम्यान या घटनेमुळे संताप होऊन अनेक हिंदूवादी संघटनांचे कार्यकर्ते व नेते पोलीस स्टेशन समोर जमा झाले होते. पोलिसांनी जप्त केलेल्या मोबाईलवर मेसेजेस पडत आणि डिलीट होत असल्याचे या नेत्यांना देखील दाखवले.

22/8/23

प्रबंधक / लिपीक

नोंदणी शाखा (पो.अ.कार्यालय, सातारा)

मात्र वातावरण तापणे सुरूच राहिले आणि ठिकठिकाणी निषेध आंदोलन , घोषणा , समाज माध्यमातून निषेध वगैरे प्रकार होऊ लागले .

दिवसभर हे कुटुंबीय पोलिस स्टेशनमध्येच थांबले रात्री घरी परत गेले दुसऱ्या दिवशी सकाळी पोलिसांनी बोलवल्यानुसार ते पोलीस स्टेशनमध्ये आले असता. पोलिसांनी याच अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करून त्याची रवानगी रिमांड होम (बाल सुधार गृह) सातारा येथे केली.

दरम्यान आई आणि मावशी यांचे मोबाईल , त्यांचे नेटवर्क वापरले असल्यामुळे पोलिसांनी तपासासाठी ताब्यात घेतले होते. या मुलाचे बांधकाम मजूर असणारे वडील कर्नाटक मधील त्यांच्या गावी गेले असता हा प्रकार घडला होता. दरम्यान ते परत आले. ते परत आल्यावर त्यांचाही मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतला व त्यांच्या पद्धतीने चौकशी चालू केली. लोकांच्या भीतीमुळे हे कुटुंबीय आपल्या घरी परत जाऊ शकले नाही त्यांना त्यांच्या राहत्या भाड्याच्या घरात राहू न देण्याविषयी अनेक धमक्या येऊ लागल्या. दहशतीमुळे कोणा नातेवाईकांकडे जाने देखील अशक्य झाले.

इकडे शहरात वातावरण तापू लागले. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान झाल्याने विविध समाज माध्यमांमधून याविषयी उलट सुलट चर्चा सुरू झाली. दरम्यान ज्यूवेनाईल कोर्टाने या मुलाला जामीन देखील मंजूर केला. परंतु हातावर पोट असणाऱ्या या गरीब कुटुंबीयांना लगेचच जामीन उपलब्ध करणे शक्य झाले नाही.

दुपारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठ्या संख्येने हिंदुत्ववादी संघटनांचा जमाव घुसला आणि त्यांनी प्रचंड प्रमाणात आक्रमक घोषणाबाजी करत गोंधळ निर्माण केला. विशेष म्हणजे या जमावामध्ये साताऱ्यातील काही कॉलेजमधील विद्यार्थी आपला ड्रेस व पाठीवरच्या सॅकसह सहभागी होऊन प्रक्षोभक घोषणा देत होते.

सामाजिक कार्यकर्ते फिरोज पठाण यांच्या कार्यालयावर देखील दगडफेक झाली शहरातील वातावरण तणावपूर्ण झाले.

त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत या मुलाच्या मावशीचा रस्त्याकडेला असणारा भाजीपाल्याचा ठेला काही समाजकंटकांनी हल्ला करून पूर्णपणे उध्वस्त केला.

यानंतर सायबर सेलने या मुलाच्या वडिलांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले. (या गृहस्थांना कन्नड आणि मोडके तोडके मराठी बोलता येते . मराठी लिहिता वाचता देखील येत नाही)

परवा रात्री दि.20-8-23 रोजी त्यांना अटक देखील केली आणि भारतीय दंड संहिता कलम २९५,१५३,५०४ लावून गुन्हा दाखल केला. काल त्यांना दोन दिवसाची पोलीस कोठडी घेतली.

हा सर्व घटनाक्रम पाहता तक्रार दाखल करण्यासाठी आलेल्या बालकावर आणि त्यांच्या वडिलांवर झालेली कारवाई अयोग्य आहे, असे आम्हास वाटते. त्यांचे अकाउंट हॅक करणाऱ्या आरोपीचा शोध घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा आणि यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्यात यावा अशी आमची आपणास विनंती आहे. तसेच यादरम्यान सदर पोस्टच्या संदर्भात समाजामध्ये मेसेजेस वायरल करून जमाव जमून ज्या पद्धतीने शहरातील वातावरण तणावग्रस्त करण्याचा प्रयत्न केला त्या सर्व व्यक्तींविरुद्ध तातडीने सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडेच आलेल्या निर्णयानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा आणि कारवाई करण्यात यावी अशी आपणास

विनंती आहे. या शहराला हिंदू-मुस्लिम ऐक्याची खुप मोठी परंपरा आहे गेल्या पन्नास वर्षात एखादा प्रसंग वगळता कधीही अशा प्रकारची दंगल किंवा तणाव या शहरात झालेला नाही. त्याला गालबोट लावण्याचा प्रयत्न जर कोणी करत असेल तर समाजामध्ये सलोखा राहावा यासाठी वॉर्डनिहाय" मोहल्ला कमिटी "गठीत करण्यात येऊन आम्हा सर्वांचे सहकार्य घेऊन शहराच्या प्रतिमेला साजेल अशा पद्धतीने कामकाज होईल याची आपण सर्वजण मिळून काळजी घेऊया असे आम्हास वाटते.

आपले विश्वासू,

1) मिनाज सय्यद परिवर्तनवादी संघटना समन्वय समिती सातारा

2) विजय द. मांडके – विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र — वि. मांडके

3) गणेश कारंडे संत रोहिदास सा. से. संस्था

4) जमीर शेख

5) गणेश भिसे (VBA सातारा जिल्हा)

6) ॲड. वर्षा देशपांडे.

7) ॲड. शैला जाधव.

8) गुफरान इस्माईल शेख

9) मुजम्मिल नदाफ

10) Salim Khan